1 2 MAY 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'यिन'च्या शिबिरात सहभागासाठी उत्स्फूर्त नोंदणी

## चला, घडूया देशासाठी : २३ मेपासून विद्यापाठातील भाषा भवनात शिबिर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : 'डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशन'च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क-'यिन' या व्यासपीठाच्या माध्यमातून २३ ते २५ मे या काळात 'यिन समर यूथ समिट'चे आयोजन केले आहे. पदवीचे शिक्षण घेणाऱ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवनात सलग तीन दिवसांचे हे शिबिर असेल. शिबिरात सहभागासाठी तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे. इच्छुकांनी तत्काळ नोंदणी करावी, असे आवाहन 'यिन' परिवाराने केले आहे.

### यांचे विशेष सहकार्य

**श्री महालक्ष्मी अन्नछत्र सेवा ट्रस्ट आणि विद्या प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांचे शिबिरासाठी सहप्रायोजकत्व मिळाले आहे. तरुणाईला उन्हाळ्याच्या सुटीचा सदुपयोग करून ऊर्जा देण्यासाठी व तरुणांनी स्वतःला घडवतानाच देशालाही घडवावे, या हेतूने स्वतःचा शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक विकास व्हावा म्हणून हे 'समर यूथ समिट' मोलाची भूमिका बजावणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- ९९७०८७६९७२, ८८८८१६६११४.**

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

चला घडूया देशासाठी

तरुणांमधील सळसळत्या उत्साहाला दिशा देण्यासाठी 'यिन' राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये कार्यरत आहे. यंदाच्या समर यूथ समिटमध्ये राज्यातील तज्ज्ञ मंडळी तरुणाईशी संवाद साधणार आहेत. यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्थेसह तीन दिवसांत जेवण, शिबिर किट, बॅच आणि सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. सलग तीन दिवस सकाळी नऊ ते सायंकाळी सात या वेळेत तीन सत्रांत शिबिर होईल. सक्सेसफुल बिझनेस, टीम बिल्डिंग, युवा व राजकारण, सेलिब्रेटींशी संवाद, डिजिटल व ऑनलाइन मार्केटिंग आणि सायबर क्राइम, ऑनलाइन बँकिंग, स्टार्टअप-द नेक्स्ट बिग थिंग, इमेज बिल्डिंग, आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांशी संवाद, क्रीडा व करिअरविषयी मार्गदर्शन, प्रेझेंटेशन स्किल्स अशा विविध विषयांवर विविध सत्र होतील. यात देश-विदेशातील तज्ज्ञ मार्गदर्शक तरुणाईशी संवाद साधणार आहेत. यातून प्रत्येकाला नवी प्रेरणा आणि दिशा मिळणार आहे. सहभागासाठी 'यिन' सदस्यांना शंभर रुपये आणि इतर विद्यार्थ्यांना तीनशे रुपये प्रवेश शुल्क असेल. चला तर मग आजच नोंदणी करूया...!